
# नवनीत २०११



## मुखपृष्ठाविषयी

शालेय जीवनात गणित हा विषय अनिवार्य आणि महत्त्वाचा आहे. त्याच्यात आवडही निर्माण व्हावी म्हणून आम्ही विविध उपक्रम करीत असतो. या वर्षी गणिताचे डिझाईनशी असणारे नाते दाखविण्यासाठी एक नवीन उपक्रम केला. याची कल्पना आम्हाला दक्षिण भारताच्या अभ्यास-सहलीमध्ये मिळाली.

वहीत वेगवेळ्या मापाच्या भौमितिक आकृत्या अचूक काढण्यापाशी न थांबता आम्ही रंगीत कागदांवर या आकृत्या काढल्या. प्रत्येक गटाला वेगवेगळ्या रंगाच्या कागदांबरोबरच वेगवेगळी मापेही दिली. तयार झालेले वेगवेगळ्या रंगाचे आणि मापाचे गोल आणि त्रिकोण मुलांनी कापले. त्याची वेगवेगळी डिझाइन्स तयार करून रंगीत कागदावर चिकटविली. त्रिकोणापासून आयत गोल असे विविध आकार केल्यामुळे या भौमितिक आकारांचे परस्परसंबंध मुलांच्या लक्षात आले. उद्या भौमितिक प्रश्न सोडविताँना तो संबंध मुलांना नक्कीच जोडता येईल. येवढेच नव्हे तर वर्तुळात वर्तुळ गुंतवून डमरू सारखे आकार तयार करणे किंवा त्रिकोणांमधून कमळ करणे, वर्तुळाच्या कडा दुमडून षटकोन मिळवणे अशा कृतींमधून एका आकृतीच्या रेषांच्या मर्यादांबाहेर विचार करण्याची क्षमताही मुलांमध्ये निर्माण होईल असे मला वाटते.

**वर्षा लाळगे**

प्रगत शिक्षण संस्था, फलटण
वार्षिक पत्रिका

# नवनीत

मे २०११

**संपादकीय सहाय्य**
डॉ. मंजिरी निमकर
मधुरा मणेर
प्रकाश अनभूले

**मुखपृष्ठ**
गोलांपासून डिझाइन, इ. ५ वी

**मलपृष्ठ**
त्रिकोणांपासून डिझाइन, इ. ६ वी

**रेखाचित्रे**
ऐश्वर्या भोकरे
ऋषिकेश कट्टे

**रेखाटन मार्गदर्शक**
सुशांत अहिवळे

बहुसंख्य कथा व कवितांची चित्रे त्या त्या लेखक व कविंनी काढलेली आहेत.

**प्रकाशन :** प्रगत शिक्षण संस्था, रिंगरोड, फलटण ४१५ ५२३
**संगणकीय अक्षरजुळणी** : अपर्णा टाकसाळकर, प्रकाश अनभूले, कमला निंबकर बालभवन
**मुद्रण :** श्री. विशाल मोहिते, लखन चव्हाण, कमिन्स डिझल इंडिया प्रिंटींग युनीट, प्रगत शिक्षण संस्था, फलटण

**फोन** : ०२१६६-२२३०४१
**email** : pragatshikshansanstha@gmail.in
**website :** www.pragatshikshan.org, www.cllcindia.org

# अनुक्रमणिका

प्रस्तावना/डॉ. मंजिरी निमकर/iv
पाऊस येण्याआधी/शुभम बेलदार, ५ वी/१
थेंब थेंब पाऊस/रोहित काकडे ४ थी/२
पाऊस धारा/अक्षता मगर, ८ वी/३
धड धड वाजले ढग/हर्षवर्धन मोहिते, ३ री/३
झाड/सितारा मणेर, ५ वी/४
वाढदिवस/प्राजक्ता माने, ४ थी/५
बाळ आणि आई/स्वालिहा शेख, ३ री/६
आई आणि पिलू/श्रुती भोसले, मधला गट, आपली शाळा/६
मला वाटते/अमित कदम, १ ली/७
काम/प्रेरणा लंभाते, १ ली/७
या मोठ्यांशी वागावे तरी कसे?/सानिया सस्ते, ३ री/८
या मोठ्यांशी वागावे तरी कसे?/आकांक्षा मोरे, ३ री/९
बाबा/ओंकार गायकवाड, ५ वी/१०
माझे बाबा/सोनाली काकडे, ५ वी/११
शून्याची किंमत/अभिषेक शिंदे, ८ वी/१२
मनीचं पिल्लू/ऋषिकेश जाधव, ६ वी/१३
दर कमी झाले/वैष्णवी घनवट, २ री/१४
धष्टपुष्ट बैल/सूर्यजित गुंजवटे, ४ थी/१५
आम्ही अनुभवलेली मॅच/ऋतुराज कदम, अभिषेक शिंदे, ऋषिकेश कट्टे, ८ वी/१६
छोट्यांच्या नजरेतून वर्ल्डकप/हर्षदा साखरे, राजवीर माने, सई फौजदार, १ ली/१७
वारकऱ्यांची शाळा/शिवानी थोरात, ८ वी/१८
उद्याचे सी.आय.डी. रहस्याच्या मागावर/शरयू फणसे, ६ वी/१९
रेडिओ/प्रथमेश इनामदार, ८ वी/२०
सोनेरी पहाट/अकिब आतार, ८ वी/२३

भूत/श्रुती भोसले, २ री/२४
दार/रोहन तावरे, ५ वी/२४
गाईचे सिझेरिअन/राहुल राऊत, ५ वी/२५
फटाक्याविना दिवाळी/तेजस्वी घनवट, ९ वी/२७
माझी शाळा/स्नेहा चव्हाण, ५ वी/२८
माझा छंद/अजिंक्य लिपारे, ८ वी/२९
करामत मोबाईलची/जयकुमार मेटे, ९ वी/३०
ती वाळलेली तुळस/वैष्णवी हेंद्रे, ७ वी/३१
मामाजी के गाँव में/आशुतोष शिंदे, ६ वी/३२
खेत की सैर/ प्रणित घोरपडे, शिवम खांडेकर, ६ वी/३३
मेरा भैय्या/समीक्षा दीक्षित, ६ वी/३४
काँव-काँव/मयूर गायकवाड, ६ वी/३४
क्या हुआ गौरी/गौरी स्वामी, ६ वी/३५
धूमधाम/कल्याणी सस्ते, ६ वी/३५
In the Flood/Akshata Magar, Standard 8/३६
A Stormy Rainy Day /Pranjali Bhujbal, Standard 8/३७
Solve My Riddles/Rohan Taware, Saloni Wala, Sitara Maner,
Rushikesh Nimbalkar, Standard 5/३८
My School/Ruturaj Kadam, Standard 8/३९

# प्रस्तावना

नवनीत पुन्हा एकदा मुलांचे लिखाण घेऊन वाचकांच्या मनोरंजनासाठी हजर आहे. बदललेल्या मूल्यमापन पध्दतीमुळे मुले पाठ्यपुस्तके-पाठांतर-परीक्षा-मार्क यांच्या चौकटीतून बाहेर पडली. जणू पंखच फुटले त्यांना. पहिलीपासून नववीपर्यंत नवनवीन कल्पना घेऊन कवितांचा पाऊस पडला. बालवाडीतल्या श्रुतीने सूर्याला डोंगराचे बाळ मानले तर तिसरीतल्या स्वालिहाने झाड आई आणि झाड बाळ एकमेकांशी काय बोलतील अशी कल्पना केली आहे. प्रेरणा पहिलीत असूनही आईला कामात मदत करते आणि आईलाही त्याची जाणीव आहे. त्या दोघींमधला हा गोड संवाद कवितेच्या रूपाने तिने मांडला आहे. सोनालीचे बाबांविषयीचे प्रेम् तिच्या कवितेतून दिसते तर ओंकारच्या कवितेतून दिसते बाबांच्या भेटीसाठी चाललेली त्याची तडफड. शिवानीने पंढरपूरचे मंदिर म्हणजे वारकऱ्यांची शाळा अशी कल्पना केली आहे.

झाड, वाढदिवस, फटाक्याविना दिवाळी, वाळलेली तुळस या लेख व कवितांमधून मुलांचे निसर्गप्रेम स्पष्ट दिसते. हे प्रेम निव्वळ झाडे लावा-झाडे जगवा प्रकारचे नसून .निसर्गातील घटक व आपली त्यांच्या बाबतीत असलेली जबाबदारी यात दिसते. भूत, दार यांसारख्या मराठीतील व इतर हिंदीतील छोट्या छोट्या चटपटित, खुसखुशीत कवितांमधून मुलांचा भाषेशी चाललेला गमतीचा खेळ दिसतो.

मुलांनी मोठे होण्याची मोठ्यांना एकीकडे घाई झालेली असते तर दुसरीकडे आपली सत्ताही सोडायची नसते. 'या मोठ्यांशी वागावे तरी कसे' या सानिया व आकांक्षाच्या लेखांमधून याचे प्रतिबिंब दिसते. 'वर्ल्ड-कप' नेही मुलांच्या दुनियेत काय गडबड उडवून दिली ते लिहितात आठवीचे ऋतुराज, ऋषिकेश आणि अभिजित पहिललीचे हर्षदा साखरे आणि राजवीर माने.

मुलांचे जगाविषयीचे भान 'दर कमी झाले' या वैष्णवीच्या छोट्या कथेमध्ये दिसते. गाईचे सिझेरियन, In the flood आणि A stormy rainy day या लेखांमधून आपल्याला मुलांच्या आयुष्यात डोकावता येते. प्रथमेशला रेडिओचे आजच्या आयुष्यात

कमी होणारे स्थान पाहून पूर्वीचे सोनेरी दिवस आठवतात व स्वतःच्या आयुष्यातील त्याचे महत्त्व सांगावेसे वाटते तर तंत्रज्ञानाच्या तालावर नाचण्याने सारासार विचार करण्याची शक्ती खुंटील टांगून काय होते ते जयकुमार आपल्या मोबाईलची करामत या अनुभव कथनात स्पष्ट करते. अखेर माझी शाळा व My school या लेखांमधून मुलांचे शाळेविषयीचे प्रेम जेव्हा वाचायला मिळते तेव्हा कोणत्याही शिक्षकाचा श्रमपरिहार झाल्याशिवाय राहणार नाही.


**डॉ. मंजिरी निमकर**

# पाऊस येण्याआधी

शुभम बेलदार
इयत्ता ५ वी

पाऊस येण्याआधी ढग काळे काळे दिसतात. शेतकरी आपले काम सोडून घरी येतात. नंतर अंधारून येते. वारे सुटते. विजा लवलवतात. आभाळ गडगडते. पक्ष्यांचा किलबिलाट सुरू होतो. जनावरे गोठ्यात बांधतात. शेतकरी लोक वैरणी झाकून टाकतात. पक्षी पाऊस येण्याअगोदर आपआपल्या पिल्लांना घेऊन घरात बसतात. पाऊस येण्याअगोदर माणसांची कामाची गडबड होते. हवेची गार लहर सुटते. मग हळुहळू पाऊस येतो.

❑



ऐश्वर्या भोकरे

## थेंब थेंब पाऊस

पाऊस पडतो टप टप टप
पक्षी उडती झप झप झप
थंड वारा भिर भिर भिर
अंगभर थंडी शिर शिर शिर
निथळत झाडे थेंब थेंब थेंब
मुलेही भिजली चिंब चिंब चिंब
काळे ढग हे खूप खूप खूप
सूर्य झोपतो गुपचूप गुपचूप

**रोहित काकडे**

**इ. ४ थी**



रोहित काकडे

## पाऊसधारा



रिमझिम रिमझिम पाऊसधारा
सुसाट वेगी वादळ-वारा

गार गार ही सांजवेळ
वाऱ्या-पावसाचा आरंभला खेळ

चिंब भिजलेली सांज अन् पहाट
पाण्याने साचलेली प्रत्येक वाट

स्तब्ध करणारा वादळाचा कडकडाट
हळवा हळवा पाखरांचा चिवचिवाट

अशा या निसर्गाच्या रुपात
मीही भरपूर आनंदात

**अक्षता मगर**
**इ. ८ वी**

## धड धड वाजले ढग

धड धड वाजले ढग
जोराचा आला पाऊस
विजा लागल्या चमकायला
झाडे लागली हलायला
मुलगा लागला भिजायला

**हर्षवर्धन मोहिते**
**इ. २ री**

# झाड

**सितारा मणेर**

**इयत्ता ५ वी**

झाड हे आपल्या सर्वांना आवडते. झाडापासून आपल्याला फळे, फुले मिळतात. मला झाड बघितले की खूप आनंद होतो. माझ्या घरी खूप झाडे आहेत. आंबा, पपई, नारळ, सिताफळ, रामफळ, घेवडा, गुलाब, रेवडी इ. झाडे आम्ही लावली आहे. ती झाडे दाट आणि सुंदर दिसतात. मी जेव्हा लहान होते तेव्हा त्या झाडांच्या सावलीमध्ये झोपायचे, खेळायचे. मला त्या झाडाच्या सावलीमध्ये भांडीकुंडी खेळायला व अभ्यास करायला खूप आवडायचे. मी सारखी त्या झाडाबरोबर खेळायची. मी जशी मोठी मोठी होत गेली तशी झाडांना फळे, फुले यायला लागली. मी झाडावर पाऊस पडला की झाड हालवायची आणि तिथे नाचायची तेव्हा मला खूप मजा यायची. एखाद्या झाडाची फांदी तोडली की मी आईला रागाने म्हणायची की फांदी कशाला तोडली ते झाड कसे दिसते बघ.

मी रविवारी आमच्या घरी लपाछपी खेळायला बोलवते. मग आम्ही १०, २०, ३०, ४०, ५० असे म्हणून राज्य घेतो आणि झाडामागे लपतो. मला झाडामागे लपायला खूप मज्जा येते. मी खूप झाडे लावली. त्याला फळे, फुले आली. मला अजूनही झाडाखाली अभ्यास करायला, झोपायला, खेळायला, लपायला आवडते. मी एक तुळस लावली होती, ती मोठी झाली. नंतर भिंती, फरशीतून तुळशी आल्या. म्हणून म्हणते की झाडे लावून वेगळीच मजा मिळते. झाडे तोडून कधी मजा मिळत नाही. म्हणून झाडे लावा, पर्यावरण वाचवा.

❑



# वाढदिवस


**प्राजक्ता माने**

**इयत्ता ४ थी**

माझी आजी पुण्याला राहते. तिच्या अपार्टमेंटपाशी एक डेरेदार असे आंब्याचे झाड आहे. मी दर उन्हाळ्याच्या सुट्टीत त्या आंब्याचे वेगवेगळे पदार्थ चवीने खाते.

एका सुट्टीत मला कळाले की ते झाड तोडणार आहेत. तेव्हा मी पहिलीत होते. मग मी परीक्षा संपताच तडक पुण्याला गेले. तेव्हा मला कळाले की ते झाड तोडण्याचे कॅन्सल झाले आहे. तेव्हा मी माझ्या मैत्रिणींची सभा घेतली व त्यात ठरवले की दरवर्षी २२ मे ला या झाडाचा वाढदिवस साजरा करायचा. आम्ही तो करतोही. आम्ही झाडाभोवती रांगोळी काढून त्याच्याभोवती गोल गोल फिरत गाणी म्हणतो. मग सगळे मिळून स्वच्छता करतो. मग आईस्क्रीम आणि सरबत पितो. मला तर या झाडाला झाड म्हणू वाटत नाही. मी तर त्याला माझ्या मित्रा अशीच हाक मारते. मला माझा मित्र खूप आवडतो.


❑



## बाळ आणि आई

जोराचा वारा सुटला
झाडाचा परिवार डुलायला लागला
आपला वारा आपल्यालाच छान वाटतोय
एकदाचं नाचायला भेटतंय
झाड म्हणालं, आई आज
खुप मज्जा येतीये
बाळ म्हणालं, आई आपण सगळ्यांना फळं देतो
पण ते आपल्याला पाणी काही देत नाहीत
फळं लागल्यावर मात्र
हवरटवानी फळं घेतात
आई म्हणाली जाऊ दे रे बेटा
आता बोलून तरी काय फायदा?

**स्वालिहा शेख**
इ. ३ री



## आई आणि पिलू

सूर्य हे डोंगराचं बाळ असतं
कारण ते डोंगराच्या पोटात लपतं
सूर्य दिवसभर डोंगराला हुडकतो हुडकतो
मग संध्याकाळी डोंगराच्या पोटात जाऊन लपतो
मग सगळीकडे अंधार होतो
मग आपण जेवतो आणि झोपतो.

**श्रुती भोसले, मधला गट**
**आपली शाळा**

## मला वाटते

मला वाटते, मला वाटते
हवेत उडावे
हवेत उडून
मला नाही येत कंटाळा
सकाळचे ७ वाजले
मला नाही आला कंटाळा
दुपारचे २ वाजले
मला नाही आला कंटाळा
रात्री ८ वाजले
मला नाही येत कंटाळा
मी हवेत खूप खूप उडलो
मला आला कंटाळा

**अमित कदम**
इ. १ ली

## काम

आई तुझे काम कर
मी बाळाला देते पापी
मग तो गप्प बसेल
मग मी बाळाला झोक्यात झोपवीन
आई मी तुला मदत करू का?
नको नको बाळा
सायकल खेळ जरावेळ

**प्रेरणा लंभाते**
इ. १ ली



# या मोठ्यांशी

आई आणि बाबा सतत सांगत असतात की हे करू नको ते करू नको. मी वागावं तरी कसं? हेच मला कळत नाही. एकदा काय झालं, उन्हाळ्याची सुट्टी लागली होती. माझ्या घराजवळची सगळी मुलं-मुली पोहायला चालली होती. त्यांच्या बरोबर कोणीही मोठं नव्हतं पण त्यांच्याबरोबर जावं वाटलं म्हणून मी मुलांना थांबवून पप्पांना विचारायला गेले. पप्पा म्हणाले त्यांच्याबरोबर कोणीही मोठं नाही. तू जाऊ नको. दुसऱ्या दिवशी मी भाजी चिरत होते तेव्हा आई आली ती म्हणाली भाजी चिरू नको तरी मी आईचं ऐकलं नाही. पुन्हा आई रागवली. मग मी मनात म्हणाले या मोठ्यांशी वागावं तरी कसं? थोड्या दिवसांनी आजीकडून काचेचा ग्लास फुटला. मी त्याच्या काचा भरायला गेले. तरीपण आजी म्हणाली काचा भरू नको तुला लागतील. सगळे घरातील नको नकोच म्हणत असतात. तेव्हा मला त्यांचा खूप राग येतो. कधी कधी हातपायसुध्दा आपटते.

**सानिया सस्ते, इ ३ री**



# वागावे तरी कसे?

## इ. ३ री

मी स्वयंपाक करायला गेली तर मम्मी नको म्हणते. भाजेल तुला. मी टी.व्ही.जवळ बघायला गेली तर पप्पा म्हणतात चष्मा लागेल. काल आम्ही पुस्तक बघायला गेलो. मला सिंड्रेला पुस्तक आवडले, मम्मी म्हणाली नको घेऊ.

मी खेळायला जाते. मम्मीला सांगून जाते तर मम्मी म्हणते नको जाऊ. भांडणं होतात. चित्र काढायला गेले तर म्हणतात अभ्यास नाही का? मी खेळायला लागली तर म्हणतात पाढे कर. घरात सायकल चालवू नकोस पडशील.

एकदा मणी घेऊन मी एक माळ तयार केली. ती घालून मी आजोबांकडे गेले. आजोबा म्हणाले लहान आहेस का आता कशाची पण माळ करून फिरायला? सगळ्यात मोठी आहेस ना तू? मग मी आजीकडे गेले. आजी म्हणाली कळत नाही का तुला माझे मणी घेऊन माळ करून फिरतेस. आज मण्यांची केलीस उद्या चपलांचा हार करून फिरशील. ती माळ काढून ठेवून मी झोपायला गेले. मी पप्पांबरोबर बोलली नाही. मग मला कळलं की हे माझ्या काळजीसाठी म्हणतात.

आकांक्षा मोरे इ ३ री



# बाबा

बाबा गेले सोडून मला
आईनेच दिली त्यांची माया

आईने घेतले कुशीत जरी
बाबांना न विसरीन मी


बाबांसारखे संस्कार दिले आईने
आता झालो मोठा तिचे कृपेने

बाबा या लवकर वाट पाहतोय मी
आतापर्यंत सगळ्यांचे मन आवरूनी

बाबा तुम्ही विसरला जरी मला
पण मी नाही विसरलो तुम्हाला

आहे सगळे छान घरात
मनात दुःख वावरूनी उरात

**ओंकार गायकवाड**
**इ. ५ वी**



ऐश्वर्या भोकरे

# शून्याची किंमत

**अभिषेक शिंदे**

**इयत्ता ८ वी**

दररोजच्या दृष्टीकोनातून बघायला गेले तर 'तू शून्य आहेस' या उदाहरणातून शून्य या शब्दाचा उपयोग एखाद्या गोष्टीत कमी आहे असे दर्शविण्यासाठी केला जातो. तसेच 'त्याने शून्यातून राज्य निर्माण केले' या वाक्यातसुध्दा शून्य या शब्दातून 'हालाखीच्या परिस्थितीतून' किंवा 'कमतरतेतून' असा बोध देण्याचा प्रयत्न आहे. हा झाला रोजच्या शून्याबद्दलचा शून्य विचार. या विचाराला मी एवढ्यासाठी शून्य विचार म्हटले कारण शून्य म्हणजे कमतरता, कमीपणा एवढेच नव्हे तर शून्य हा 'अफाट' या अर्थानेही जाणला जाऊ शकतो. हे अर्थ तुम्हा-आम्हालाच नाही तर ज्याने शून्याचा शोध लावला त्यालाही माहीत नसतील. मी अनुभवलेल्या शून्याच्या प्रसंगाबद्दल सांगितल्यावर तुम्हाला याची खात्री पटेल.

ऑक्टोबर महिना होता. आठवीची प्रथम सत्र परीक्षा होती. पहिलाच पेपर मराठीचा होता. मराठीच्याच बाई आमच्या वर्गावर सुपरव्हिजनवर होत्या. शेवटचा प्रश्न होता की खालील विषयांवर १०० ते १५०० शब्दांत निबंध लिहा. मी उत्तर लिहीत असताना अचानक बाईंच्या मनात काय आले आणि त्यांनी त्यांचा पेन काढला आणि माझ्या उत्तरपत्रिकेतील दीड हजार (१५००) या अंकातील एक शून्य खोडला व मला म्हणाल्या प्रश्नपत्रिकेवर पण खोड. एवढे म्हटल्या व त्या पुढे गेल्या. पुढे जाऊन म्हणाल्या प्रश्न क्रमांक सहा अ काढा व १०० ते १५०० मधील दीड हजारच्या शेवटचा शून्य खोडा. हे ऐकून सारे हसत हसत शून्य खोडू लागले. नंतर परत बाई म्हणाल्या शून्याला खूपच किमत दिली गेली आहे.

हा प्रसंग साधा-सुधा नाही. शून्याला प्रचंड किंमत आहे हे सांगणारा आहे. असाच अजून एक प्रसंग आहे.

चार-पाच वर्षांपूर्वी टी.व्ही.वर एक जाहिरात लागायची. ती जाहिरात बहुतेक पत्रा जेथे गळत असतो ते पॅक करणाऱ्या पेस्टची होती. एक वयस्कर म्हातारी तिची प्रॉपर्टी तिच्या मुलाला चेकच्या स्वरूपात देत असते. ती मरणाच्या दारात असते. चेकवर तिला सही करून एक करोड रुपये अंकात लिहायचे असतात. ती एक काढून पुढचे शून्य काढायला लागते. शेवटचे दोन शून्य राहिलेले असतानाच ती मरते. तोच वरून पाण्याचा थेंब पडून सारे शून्य पुसले

## माझे बाबा

माझे बाबा करतात कोंबड्यांचा बाजार
तिथे येतात कोंबड्या पाचशे किंवा हजार


बाबा कधी आणतात कोंबड्या पाळायला
आम्ही नेतो त्यांना इकडे तिकडे फिरायला

बाबा आणतात कधी खाऊ
तर कधी म्हणतात आपण फिरायला जाऊ

माझे बाबा ईश्वरा समान
आम्ही देतो त्यांना मान

माझे बाबा गाळतात घाम
आणि करतात कष्टाचे काम

सोनाली काकडे
इ. ५ वी



जातात. हे पाहून मुलगा रडत बेशुध्द पडतो. पहा, शून्य त्या मुलाला किती भारी पडला. म्हणूनच मला तर वाटते शून्य मोलाचा आहे. आमच्या मराठीच्या बाईंनासुध्दा कळून चुकले होते की शून्याला किमत अनंत आहे. तुम्हालाही याची खात्री पटावी म्हणून हा लेख लिहिला. आता काय पटली ना खात्री?

❑

---

## मनीचं पिल्लू

मनीचं पिल्लू पायात लोळतं
मनीच्या बरोबर खूप खूप खेळतं
दूध नाही दिलं तर खूप ओरडतं
ओरडून ओरडून थकून जातं
डोळे बंद करून शांततेत बसतं
दूध दिल्यावर खूप खूश होतं
दूध पिऊन झाल्यावर डिशपण चाटतं
आम्हाला त्याचं कुतूहल वाटतं
आनंदी होऊन खेळत बसतं
मनी आल्यावर मनीबर खेळतं
थकून गेल्यावर गादीवर चढतं
मनीच्या मऊ कुशीत झोपून जातं
मनी निघून गेली की खूप ओरडतं
मनीचं पिल्लू मला खूप आवडतं


ऐश्वर्या भोकरे

**ऋषिकेश जाधव**
इ. ६ वी


# दर कमी झाले

**वैष्णवी घनवट**

**इयत्ता २ री**

एक कोळी माणसाचा मुलगा रडत असतो. एकजण त्याला विचारता तू का रडत आहेस? तर तो म्हणतो मला आईने जेवायला दिले नाही. मग तो माणूस त्याच्या आईकडे जातो. म्हणतो, तू तुझ्या मुलाला जेवायला का दिले नाही? ती म्हणते, आज आमच्या नवऱ्याने मासे पडकले नाहीत. तो तिच्या नवऱ्याकडे जातो म्हणतो, "तू मासे का पकडले नाही? तो म्हणतो, सरकारने माशाचे दर कमी केलेले आहेत. तो सरकारकडे जातो आणि म्हणतो, तुम्ही माशाचे दर का कमी केले? सरकार म्हणते, तेल, ऑइल घेऊन जाणारी जहाजं बुडली. त्याच्यामुळे मासे मरले व जिवंत असणारे मासे लोक खात नाहीत. त्याच्यामुळे माशाचे दर कमी झाले आहेत. मग तो लोकांकडे जातो म्हणतो, तुम्ही मासे का खात नाही? लोक म्हणतात, आम्ही जर मासे खाल्ले तर आम्ही मरून जाऊ. तो म्हणतो, ते कसे काय? लोक म्हणतात, आम्ही जर मासे खाल्ले तर माशाच्या पोटात असलेले ऑइल आमच्या पोटात जाऊन आम्ही मरू शकतो.

❑




# धष्टपुष्ट बैल

सूर्यजित गुंजवटे
इयत्ता ४ थी

एक गाव होते. त्या गावाचे नाव होते चक्रमवाडी. गावात एक शेतकरी राहत होता. तो खूप श्रीमंत होता. या शेतकऱ्याकडे एक बैल होता. तो शरीराने धष्टपुष्ट होता. त्याला खायला घालायला एक नोकर होता. त्या बैलाबरोबर दुसरा बैल नव्हता. तो दोन बैलांची कामे एकटा करी. शेतकऱ्याच्या शेतात खूप गवत वाढले होते. त्यामुळे गवतात मुंगूस खूप होते. त्यांनी शेतात धुमाकूळ घातला होता. शेतकऱ्याचा बैल शेतात गवत खायला जायचा. एकदा गवत खाता खाता बैलाचा एका मुंगूसावर पाय पडला व मुंगूस तडफडून मेला. ही बातमी त्या मुंगूसाच्या मित्रांना कळाली मग त्यांनी बैलावर हल्ला चढवला. बैलाने लाथा मारुन मुंगूसांना मारून टाकले. त्यामुळे मुंगूसाच्या राजाला खूप दुःख झाले. तो राहिलेल्या मुंगूसांसह त्या शेतातून दूर निघून गेला.

❑



सूर्यजित गुंजवटे

# आम्ही अनुभवलेली वर्ल्डकप मॅच

ऋतुराज कदम, अभिषेक शिंदे, ऋषिकेश कट्टे
इयत्ता ८ वी

२०११ चा वर्ल्डकप फारच जोमात चालला होता. सामने फारच रंगत होते. क्रिकेटवेड्या भारताला यंदाच्या वर्ल्डकपचे संयुक्त यजमानपद मिळाले होते. त्यामुळे भारतीयांचा आनंद शिगेला पोहोचला होता.

साखळी फेरीतील सामने संपून बाद फेरीच्या सामन्यांना सुरुवात झाली होती. आत्तापर्यंतचा भारतीय संघाचा प्रवास उत्तमच झाला होता. संघातील अनेक खेळाडूंनी उत्तम योगदान दिले होते.

पहिल्यापासून वर्ल्डकपच्या विजयासाठी प्रबळ दावेदार असलेल्या भारताचा सामना झाला तो चार वेळा वर्ल्ड चॅम्पियन असलेल्या ऑस्ट्रेलियाशी. उपांत्यपूर्व फेरीतील हा सामना अतिशय रोमहर्षक झाला. भारतीय खेळाडूंनी आपल्या जिवाचे रान करून उपांत्यपूर्व लढत जिंकून मोठ्या गर्वाने उपांत्य लढतीत प्रवेश केला.

उपांत्य लढतीत भारताची गाठ होती ती पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानशी. दोन्ही संघ बलाढ्य. दोन्ही संघांमध्ये सामना फिरवू शकणारे अनेक खेळाडू होते. म्हणून सामना रोमांचक होणार यात काही वादच नव्हता.

बुधवार ३० एप्रिल २०११ चा तो दिवस उजाडला. आम्ही सकाळपासून सुट्टी मिळेल अशा आशेवर होतो. पण सारे काही आमच्या विरोधात गेले. शाळेला सुट्टी मिळाली नाही. सर्वांचेच चेहरे पडले.

अडीच वाजले. सामना सुरु झाला. परीक्षेचे दिवस असूनही सगळीकडे क्रिकेटचाच विषय चालला होता. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. याचा एकीकडे आनंद होत होता तर दुसरीकडे आपल्या संघाची फलंदाजी बघायला मिळणार नाही याची खंत वाटत होती.

वर्गातल्या शिकवण्याकडे कोणाचेच लक्ष नव्हते. जो-तो येणाऱ्या जाणाऱ्याला स्कोअर विचारत होता. शिक्षक, पालक सर्वांनाच विद्यार्थी स्कोअर विचारत होते. एका कुणाला स्कोअर कळला की तो सर्वांपर्यंत वाऱ्यासारखा पसरत होता.

मधली सुट्टी झाली. प्रार्थना हॉलमध्ये जेवत असताना तर कहरच झाला. जेवण्याकडे कोणाचेच लक्ष नव्हते. शेजारच्या घरातील टी.व्ही. बघून गच्चीत बसलेल्या गटातील मुले स्कोअर सांगत होती. मधेच एक बातमी आली की सचिन

आऊट झाला. तेव्हा सर्वत्र शांतता पसरली. तेवढ्यात ही बातमी खोटी होती हे समजले. तेव्हा मुलांनी मोठ्याने ओरडून आपला आनंद व्यक्त केला.

तासावरून आम्ही शिक्षकांना शूला जाऊ का असे विचारून शूला जायचो आणि स्कोअर विचारुन यायचो. एकाआड एक जण शूला जाऊन यायचा. आम्ही दोघे तिघे तर पाच सहा वेळा शूला जाऊन आलो. वर्गात शिकविण्याकडे आमचे लक्ष लागत नव्हते. शिक्षकांनीही त्या दिवशी आम्हाला पुन्हा पुन्हा सोडले.

बाहेर ग्रुप स्टडीला आल्यावर रस्त्यावरून येणारे जाणारे मुलांना स्कोअर सांगत होते. स्कोअर ऐकता ऐकता पाचवा तास संपला. शेवटचा तास होता संस्कृतचा. शेवटच्या तासाला आम्हाला शिकण्याची किंवा लिहिण्याची इच्छा नसते पण त्या दिवशी सर्वांचा उत्साह काही वेगळाच होता. त्या दिरशीच्या आठवणी आमच्या ह्रदयात जशाच्या तशा राहतील.

कधी कधी असे वाटते की त्या दिवशी सुट्टी मिळाली नाही ते एका अर्थाने चांगलेच झाले. आम्हाला एक वेगळा दिवस अनुभवायला मिळाला. आमच्या स्कोअर जाणून घेण्याच्या धडपडीचे सार्थक झाले. भारताने सामना जिंकला आणि फायनलमध्ये प्रवेश केला.

❑

---

## छोट्यांच्या नजरेतून वर्ल्डकप

सचिनने रन पंच्याऐंशी काढले. भारत जिंकला. आम्ही फटाका वाजवला. पाकिस्तान मॅच हरले. धोनी कपतान होता. जहीरने व नेहराने छान बोलींग केली. मग आजीने फटाका वाजवला. सचिनने पंच्याऐंशी रन केले म्हणून त्याला लाल गाडी मिळाली. नेहराला लाल गाडी मिळाली. आणि जहीरला लाल गाडी मिळाली. मग सचिन खूष झाला.

**हर्षवा साखरे, इ. १ ली.**

भारत आणि पाकिस्तानची मॅच झाली. भारतने पहिल्यावेळस बॅटींग घेतली. धोनीनी सांगितलं होतं जे पहिल्यावेळस बॅटींग घेतील त्यांचे रन जास्त होतील.

**राजवीर माने, इ. १ ली.**

पाकिस्तानच्या एका मुलाने सीक्सर मारली तर क्याचवाला हात वर करून खाली बघत होता. थोडा हालत पण नव्हता तरीही त्याच्या हातात बॉल पडला.

**सई फौजदार, इ. १ ली.**

## वारकऱ्यांची शाळा

वारकऱ्यांची साळा पंढरीला भरती
वारकरी साळत दरबारीस नित्यनेमाने जाती

साळंला जातानं ग्यानबा तुकाराम म्हणती
तशी त्यांची साळंची वाट सरती

त्यांचा गणवेश असतो निराळा
धोतर, बंडी, नऊवार साडी आवडीनं घालती


तिथं नसती चार भिंतींची साळा
असती सारीकडं मोकळी हवा

साळतं नसती नेमलेले गुरुजी
तिथं सर्वजण मिळून शिकती

तिथं नाही शिकत अ आ ई
तर शिकती समतेचे धडे

अशा या साळंत पोरं दुरुनी येती
लाखोजण साळंत मिळून जाती

**शिवानी थोरात**
**इ. ८ वी**



# उद्याचे सी.आय.डी. रहस्याच्या मागावर

**शरयू फणसे**
**इयत्ता ६ वी**

उन्हाळ्याचे दिवस होते. परीक्षा संपली होती. आमच्या गल्लीतील मुलांचे क्रिकेट रंगात आले होते. तेवढ्यात सचिनने सिक्स मारला व बॉल पडीक जिनिंगच्या शेजारी राहणाऱ्या आजी-आजोबांच्या घरात जाऊन पडला. ते आजी-आजोबा खूप चांगले होते. अंगणातील चिंचा पाडल्या तर थोडेसे ओरडायचे. पण तसे ते खूपच प्रेमळ होते. पोरांचे व त्यांचे इस्टेटीवरून गेल्या महिन्यातच भांडण झाले होते. लेकाला इस्टेट स्वतःच्या नावावर करून हवी होती. तो आजी-आजोबांचे घर पाडून तेथे इमारत बांधणार होता. नंतर बॉल आणण्यासाठी आम्ही आजोबांच्या घरी आलो नि पाहतच राहिलो. हे काय! आजोबा सामान भरतायत आणि आजी रडतायत. नंतर आम्ही आत जाऊन पाणी आणले, त्यांना दिले व काय झाले ते विचारले. ते स्वतःला सावरून म्हणाले, "आम्ही इथे खूप पूर्वीपासून राहतोय. पूर्वी असं कधीच झालं नाही. पण आता इथे दररोज विचित्र आवाज येतात. विचित्र आकृत्या दिसतात. रात्र कधी संपतीये असं होतं. काल तर आपल्या विहिरीवर पांढरे कपडे पडले होते. या भीतीने आम्ही आता हे घर सोडून चाललोय. या घरातील प्रेमाच्या आठवणी तेवढ्या नेतो. निदान मुलाला तरी इमारत बांधता येईल." आम्ही सर्व आश्चर्यचकीत होऊन ऐकत होतो. नंतर आम्ही आजी-आजोबांना मदत करायची ठरवली आणि जो कोणी असे घाबरवत असेल त्याला पकडून द्यायचे ठरवले. सर्व ठरले, कोणी कुठे लपायचे वगैरे.

रात्रीचे सात वाजले होते. खाऊनपिऊन सात ते आठ आम्ही मिटींग घेतली. नंतर ९ वाजता आम्ही आपापल्या जागी लपलो. मी विहिरीशेजारी पिंपळाच्या झाडावर लपले होते. मला वाटले खरंच हडळ तर नसेल ना ती?

आता काळोख दाटला होता. ती अमावस्येची रात्र होती. पिंपळाची पाने सळसळत होती. तेवढ्यात बाराचा टोला वाजला. वाऱ्याचा वेग वाढला. पानांची सळसळही वाढली. विचित्र आवाज ऐकू येऊ लागले. आणि आकृत्याही दिसू लागल्या. आम्ही सर्वांनी जोरात उड्या टाकून हडळीला पकडले आणि पाहतो तो काय? हडळीचे केस उपटले गेले. ती मुळी हडळ नव्हतीच. ते होते सुधीरकाका-


**पान २२ वर**

# रेडिओ

**प्रथमेश इनामदार**

**इयत्ता ८ वी**

साठच्या दशकात एखाद्या घरात एक मोठा पेटारा असायचा. त्यातून वेगवेगळे सुरांचे तरंग उमटत. कधी त्यातून शास्त्रीय संगीताचे सूर उमटत तर कधी उडत्या चालीची गाणी. बातम्यांचा तोच चिरपरिचित आवाज घुमायचा आणि त्या मोठ्या पेटाऱ्याभोवती, अर्थातच रेडिओ-भोवती घरातले सर्व सदस्य गोळा व्हायचे. त्यांचे जणू भावविश्वच त्याच्याशी गुंफले गेले होते. तेव्हा त्यांच्या करमणुकीचे ते एकमेव साधन होते. सुरुवातीला हा जेव्हा आला तेव्हा चांगलीच खळबळ उडाली



ऐश्वर्या भोकरे

होती. भूमिगत रेडिओ केंद्राच्या माध्यमातून स्वातंत्र्य प्राप्तीतही रेडिओचे मोठे योगदान होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद केंद्राच्या माध्यमातून हजारो लोकांच्या मनात क्रांतीची मशाल पेटवली आणि इंदिरा गांधींनी आणीबाणीची काळी घोषणाही आकाशवाणीवरूनच केली होती.

सत्तरच्या दशकात बिनाका गीतमाला नावाचे वादळ सिलोन वाहिनीवरून घराघरातून घुमू लागले. या कायर्क्रमाची लोकप्रियता एवढी वाढली की या आठवड्यात कोणते गाणे वर जाणार तसेच कोणते गाणे घसरणार यावर लोकांच्या पैजा लागत. त्याकाळी सर्वांच्याकडे रेडिओ नसल्यामुळे एखाद्या किराणा दुकानात किंवा पानटपरीवर गर्दी व्हायची. दर बुधवारी रात्री नऊ वाजता लोक आपआपली कामे बाजूला ठेवून कार्यक्रम ऐकत बसायचे.

या कार्यक्रमाने आपल्याला एक अनमोल भेट दिली. जी भेट पुढे निवेदन क्षेत्राच्या दृष्टीने आदर्श ठरली. ती म्हणजे अमीन सायानी. त्या आवाजात अशी काही जादू होती की, 'भाइयों और बहनों' असे ऐकल्यावर श्रोते मंत्रमुग्धच होत.

या रेडिओचा आणखी एक रंजक पैलू म्हणजे क्रिकेटचे धावते समालोचन. भारताने सामना जिंकल्यावर सगळीकडे आनंदी आनंद व्हायचा. त्याचप्रमाणे सामना गमावण्याच्या स्थितीत आल्यावर किंवा सुनील गावसकर बाद झाल्यास सर्वांचे रेडिओ बंद केले जात.

हळू हळू ट्रान्झिस्टर आले आणि लोकांना आपले रेडिओ बाहेर घेऊन जाणे सोपे झाले.

आता थोडे आमच्या घरातील रेडिओकडे वळूया. या रेडिओचा इतिहास जरा वेगळा आहे. दोन परदेशी प्रवाशांकडे पैसे नसल्यामुळे त्यांनी त्यांचा रेडिओ गहाण ठेवला होता. तोच रेडिओ आमच्या आजोबांना मिळाला. त्यानंतर बराच काळ तो अज्ञातवासात होता. पुढे मलाच त्याचा शोध लागला आणि ज्ञान, माहिती, मनोरंजनाचा अदभुत खजिनाच आमच्यासाठी खुला झाला. हळू हळू बी.बी.सी. पासून स्थानिक वाहिनीपर्यंत सर्व वाहिन्या आपली हजेरी लावू लागल्या. या रेडिओची काळजीही आमच्या घरातील प्रत्येक जण घेत असतो. नियमितपणे साफसूफ केला जातो. बटणांना तेलपाणी केले जाते. सतत वेगळे प्रयोगही सुरू असतात. त्याची .... तुडल्यावर वडिलांच्या मागे लागून गच्चीवरून वायर घेऊन रेडिओला बांधली. मला संध्याकाळी विविध आंतरराष्ट्रीय वाहिन्या ऐकल्यामुळे फायदा झाला आहे. आंतराष्ट्रीय राजकारणाची उकल बऱ्याचप्रमाणातही झाली आहे. विविध भाषांचाही अर्थ थोड्या बहुत प्रमाणात लावता येतो. मी माझ्या या नादापायी घरच्यांची कित्येकदा बोलणी खाल्ली आहेत. तरीही माझी नाळ जुळल्यामुळे मी आता माझा छंद सोडू शकत नाही.

असाच एक किस्सा सांगावासा वाटतो. एखादी नवी वाहिनी शोधण्याचा मी नेहमीच प्रयत्न करत असायचो. एकदा अशीच एक नवी वाहिनी गवसली आणि एका मिनिटात गायब झाली. त्यानंतर ७ ते १०.३० असे जवळ जवळ साडे तीन तास मी त्या वाहिनीचा शोध लावण्यात घालवले. जेवण वगैरे सर्व विसरून अगदी मशगूल होऊन गेलो.

आता थोडे कार्यक्रमांविषयी. रेडिओवर कुठे राजकीय परिस्थितीवर विश्लेषण चालू असते तर कुठे चित्रपट संगीत. अशाप्रकारे कार्यक्रमांत विविधता असते. आजच्या संगणक आणि आयपॉडच्या जमान्यात हा अस्सल ठेवा आपण जपला पाहिजे. जसे खाजगी वाहिन्या लोकांना आकर्षित करून घेतात तसाच प्रयत्न सरकारी वाहिन्यांनीही केला पाहिजे. अर्थात आपण हा ही विचार केला पाहिजे की दोघांचीही उद्दिष्टे वेगवेगळी आहेत. आकाशवाणी सर्वांचा विचार करून कार्यक्रमांची आखणी करते तर खाजगी वाहिन्या विशिष्ट वर्गाला डोळ्यासमोर ठेवून कार्यक्रमांची आखणी करतात.

एक कार्यक्रम यशस्वी होण्यामागे कितीतरी तंत्रज्ञ असतात पण आपल्या लक्षात राहतो तो फक्त निवेदकच! त्यामुळे तंत्रज्ञांना सापत्न भावाची वागणूक मिळते. या पार्श्वभूमीवर जिग्यासा नावाच्या एका कार्यक्रमाचे उदाहरण द्यावेसे वाटते. या कार्यक्रमाने आपले सामान्य ज्ञान तर वाढतेच परंतु कार्यक्रम संपेपर्यंत साधी खरखरही ऐकू येत नाही. महक हा कार्यक्रमही असाच.

आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांचा आणखी एक पैलू म्हणजे श्रोत्यांच्या येणाऱ्या दूरध्वनींचा कार्यक्रम. काही श्रोत्यांना फोन लागल्याच्या आनंदात काय बोलायचे तेच सुचत नसते. काही जण खूप बोलतात तर काही जण निवेदकांच्या प्रयत्नांना अजिबात दाद देत नाहीत. अशा वेळी काही जमतीही घडतात. निवेदकच बोलत सुटतात. काही वेळेला गाणी उपलब्ध नसल्याचे सांगून किंवा अर्धेच गाणे ऐकवून श्रोत्यांची निराशा करतात.

एखाद्या विषयावर आपले मत कळविण्याच्या कार्यक्रमात काही श्रोते अभ्यासपूर्ण बोलतात. अशा श्रोत्यांबद्दल आपल्या मनात आदराचे स्थान निर्माण होते.

याच आकाशवाणीमुळे मला अनेक नामवंतांच्या चालू तसेच रेकॉर्डेड मुलाखती ऐकता आल्या आणि माझे अनुभवविश्व समृध्द झाले. जोपर्यंत तळमळीने कार्यक्रम सादर करणारे तंत्रज्ञ व निवेदक आहेत व त्या कार्यक्रमांचा रसिकतेने आस्वाद घेणारे श्रोते आहेत तोपर्यंत आकाशवाणीला मरण नाही.

❑

---

**उद्याचे सी.आय.डी. रहस्याच्या मागावर**

**पान १९ वरून**

आजोबांच्या मुलाचा मित्र. आजोबांच्या मुलानेच काकांकडून हे सर्व करून घेतले होते. सुधीरकाका पळत होते इतक्यात पोलिस आले आणि त्यांनी सुधीर काकांना पकडून नेले. तेवढ्यात एक आवाज जोरात घुमला. आमच्या गल्लीतील सारेजण जोराने टाळ्या वाजवत होते. आजोबांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले व त्यांनी आम्हाला जवळ घेतले. आजींनाही रडू आवरत नव्हते. त्यांनी आमची पाठ थोपटली.

❑

# सोनेरी पहाट

रोजचीच पहाट
तो पक्ष्यांचा चिवचिवाट
कोंबड्यांचे आरवणे
रोजच सकाळी लवकर उठणे

रोजचाच व्यायाम
रोजचाच ब्रश
रोजचीच कोलगेट
तो नेहमीचाच फ्रेशपणा

ती नेहमीचीच सूर्याची साथ
ते नेहमीचंच कळीचं डुलणं
ते नेहमीचंच फुलाचं फुलणं

ते नेहमीचंच येणं
ते नेहमीचंच जाणं

सकाळ म्हणजेच माझ्या
जीवनातील सोनं
नाहीतर रोजचीच सकाळ
मी अनुभवीन काय?

**आकिब आतार**
**इ. ८ वी**




## भूत

विमानतळावर जुने-पुराणे घर
घरामध्ये भूत होते वेडे
खात होते पेढे
त्याला आवडायचे वडे
झोप काढायचे दोन-दोन आठवडे
एकदा भूत गेले शाळेत
पुन्हा आले घरी वेळेत
आईला म्हणाले लागली भूक
खायला दे साखर तूप
साखर होती गोड
जिभेला आले फोड
भुताने घातली टोपी
भूत गेले झोपी

**श्रुती भोसले**
**इ. २ री**



श्रुती भोसले




## दार

एक होते दार
ते करू द्यायचे
चोरी फार

एकदा लावले लॉक
तेव्हा झाले ते पॅक

मग त्याची अक्कल
आली जाग्यावर
सज्ज झाले आपल्या कामावर

ते म्हणाले मी शिकवतो
चोरांना चांगला धडा
पण आधी माझे कुलूप काढा.

**रोहन तावरे**
**इ. ५ वी**

# गाईचे सिझेरिअन

**राहुल राऊत**

**इयत्ता ५ वी**

आमची गाय पहिलारू होती. गाईला पिल्लू होण्यासाठी नऊ महिने लागतात. गाईचे दिवस भरत आले होते. आई-पप्पा रात्रंदिवस गाईवर नजर ठेवून होते. पप्पा तर रात्री बाहेरच झोपायचे व अधून मधून गाईकडे चक्कर मारून यायचे. दिवसा आई पण इतर कामे करता करता गाईकडे लक्ष ठेवायची. गाईला कधी पिल्लू होणार म्हणून मी पण वाट बघत होतो.

अखेरीस शुक्रवारची रात्र ओलांडून आई पप्पा गोठ्याकडे बघायला गेले तर गाय खाली बसलेली होती. तिला आता पिल्लू होणार होतं. पप्पांनी तिला उठवण्याचा प्रयत्न केला पण ती उठेना. मग पप्पाही काळजीत पडले. त्यांनी डॉक्टरांना फोन केला. पण डॉक्टरांना यायला वेळ झाला. आता गाय आणखीनच अस्वस्थ झाली. ती एका अंगावर पडून राहायची व मधे-मधे जिवावर आल्यागत ओरडायची तशी मला पण भिती वाटायची. आई-पप्पा गाईजवळ बसून होते. आई तिच्या तोंडाला गळ्याला गोंजरत होती. गाईच्या डोळ्यातून पाणी येत होते. आई अधून मधून तिला वाडे चारत होती. अर्ध्या-पाऊण तासानी डॉक्टर आले. त्यांच्याबरोबर त्यांचे दोन मित्र डॉक्टरही होते. डॉक्टरांनी गाईला शेपटीखालून हात घालून तपासले व एकच पाय बाहेर काढला. त्यांना दुसरा पाय काढता येईना कारण तसे केले तर गाईच्या जिवाला धोका होता.

आता पुढे काय करायचे म्हणून त्यांनी माने डॉक्टरांना फोन करून बोलावले. त्यांनी गाईला तपासून सल्ला दिला की जास्त वेळ वाट न पाहता सिझेरिअन करा. सिझेरिअन करणाऱ्या डॉक्टरांना पप्पाच बोलवायला गेले. डॉक्टर आले व गाईला तपासले आणि सिझेरियअनचे साहित्य आणायला परत गेले. यामध्ये खूप वेळ गेला. आता गाईला त्रास होत नव्हता. मम्मी तिला गोंजरत होती. मी पण गाईला गोंजरत उभा होतो.

आता डॉक्टरांनी गाईचे पाय बांधले. आता सगळे कामाला लागले. डॉक्टरांनी गाईला भूल दिली. तिला दिसू नये म्हणून कसलीशी पावडर तिच्या डोळ्यात टाकली. डॉक्टरांनी औषधे, कापूस, इंजेक्शन बाहेर काढले. ज्या जागेचे सिझेरिअन करायचे त्या जागेचे केस काढले. डॉक्टरांनी कटरनी एक रेष मारली आणि गाईचे पोट फाडले.




डॉक्टरांनी आत हात घालून पिल्लाचे मागचे पाय पकडले व त्याला दोरी बांधून पिल्लू बाहेर ओढून काढले. गाईची फारच आबदा चालली होती. खूप वेळ गेल्यामुळे पिल्लू गुदमरून मेलेले होते. ते बाजूला करत डॉक्टरांनी गाईचे पोट शिवायला सुरूवात केली. हे सारे मी अगदी जवळून पहात होतो कारण मी कधी डॉक्टरांच्या साहित्याचा ट्रे पकडून उभा होतो तर कधी गाईचे शेपूट. कधी सुई ओवायलाही मदत करत होतो. मी डॉक्टरांचा मदतनीस म्हणून काम करत होतो. हे सारे बघताना मला रडू येत होते. गाईचे सगळे नीट होऊन ती पूर्वी सारखीच चांगली होईल ना याची मला काळजी वाटत होती.

डॉक्टरांचे टाके घालण्याचे काम चालले होते तोच पावसाला सुरूवात झाली. आता मी गाईच्या अंगावर छत्री धरून उभा होतो एवढ्यात डॉक्टरांचा दोरा संपला. मग पुढचे टाके वाकळीच्या दोऱ्याने घातले. त्यावर माशा बसू नयेत म्हणून औषध लावले. त्यावर मऊ धोतर बांधले. पुन्हा एकदा गाईला पाच-सहा इंजेक्शनस् दिली. गाईला गोठ्यात झोपवल्यावर डॉक्टर निघून गेले.

आता आम्ही घरातल्यांनी ऑपरेशनच्या जागेची साफसफाई केली. बी.एच.सी. पावडर टाकली. मेलेल्या पिलाला शेतात पुरले. तो संपूर्ण दिवस आमच्यासाठी खूपच दुःखाचा होता. सकाळपासून आम्ही सगळे गाईच्या मागे असल्यामुळे घरात स्वयंपाकही केला नव्हता. आम्ही सर्वजण

उपाशीच होतो म्हणून आई स्वयंपाकाला लागली.

गाईला उठवण्यासाठी अर्ध्या तासाने पप्पांनी तिच्या डोळ्यात आले ठेचून घातले. त्यामुळे तिची भूल उतरली. गाय उभी राहिलेली पाहून मला खूप आनंद झाला. पण तिचं पिल्लू गेलं म्हणून वाईटही वाटत होतं. दोन दिवसात गाय आणखी बरी झाली. आता हळू हळू ती इतर गाईंमध्ये मिसळून गेली. आता ती चांगली हिंडते फिरते. दूध देते. सर्वांनी आशा सोडलेली गाय आता हिंडता फिरताना पाहून सर्वांच्याच डोळ्यात पाणी येते.

❑

## फटाक्याविना दिवाळी

फटाक्याविना दिवाळी करून तर पहा ना
फटाक्याविना दिवाळी करून तर पहा ना
असते किती छान छान
फटाके नसले म्हणून काय झाले
फराळ तर असतोच ना
मी एक तुम्हाला गुपित सांगते
पहिल्यांदा चकली घ्या, चकली घ्या
भुईचक्र म्हणून खाऊन टाका
आणि मग घ्या गोड गोड लाडू
तो उडवा भुईनळा म्हणून
आता शंकरपाळी ती कशी खायची
माहितेय का चिमणी फटाका म्हणून
आता काय काय खाऊ
मी तर दमले बाबा
फटाक्यांचा फराळ घेऊन
आता तुम्ही बघा ना!
एकदा तरी प्रयत्न करून

**तेजस्वी घनवट**
इ. ९ वी


# माझी शाळा

स्नेहा चव्हाण
इयत्ता ५ वी

मी शाळेत आले तेव्हा पहिल्या दिवशी मल कोणीच भेटले नाही. दुसऱ्या दिवशी मला क्षितिजा भेटली. आमची पक्की मैत्री झाली. मला अगोदर फक्त नाचायला, खेळायला व बडबडायला यायचे. याशिवाय तर काहीच येत नव्हते. मला ही शाळा नंतर खूप आवडायला लागली. नंतर मैत्रिणींबरोबर खेळायला व भांडायला येऊ लागले. पहिलीत बेरीजेची गणिते येऊ लागली. चांगली प्रगती झाली. माझे वर्ग पुढे पुढे सरकू लागले. चित्रकलाही छान येऊ लागली. चित्रे रंगवायलाही येऊ लागली.

आता मला सायकल येते, मोबाईल वापरता येतो आणि मल्लखांबही येतो. मी मल्लखांबाच्या प्रात्यक्षिकांसाठी मुंबईला गेले होते. गाडीही चालवता येते. मला वेगवेगळ्या भाषा बोलता येतात. म्हणजेच हिंदी, मराठी, इंग्रजीही येते. आणि सर्वात वेगळ्या भाषा म्हणजेच र-फ ची, ह-ची, च-ची यासुध्दा भाषा आता मला येतात. मला बेरीज, वजाबाकी, गुणाकार, व भागाकार ही येतो. मला पेटीसुध्दा वाजवता येते. या जीवनात मला आई-बाबांच्या सर्व इच्छा व स्वप्ने पूर्ण करायची आहेत. यासाठी मी मेहनत व कष्ट करीन. हे मला या जीवनात करायचे आहे.

❑



# माझा छंद

गाणे ऐकण्याचा माझा छंद
गाणे ऐकून होतो मी धुंद

वाटते मनी क्षणो-क्षणी
ऐकत रहावी सिनेमाची गाणी


गाणे ऐकताच पाय लागतात डोलू
मनही म्हणते मधी नको बोलू
संगीताच्या तालावर गाण्यांच्या बोलावर
शब्द येतात माझ्या ओठांवर

गाणे लागताच रेडिओकडे वळतात कान
विसरून जातो मी सारे भान
गाणे ऐकण्यात होतो मी गुंग
नाचही करतो मला दंग

रविवार आणि बुधवारची मी
पहात असतो वाट
दूरदर्शनवर असतो गाण्यांचा थाट
कितीतरी गाणी आहेत माझी तोंडपाठ

गाणे ऐकण्याचा माझा छंद
गाणे ऐकून होतो मी धुंद

**अजिंक्य लिपारे**
इ. ८ वी



अजिंक्य लिपारे

# करामत मोबाईलची

**जयकुमार मेटे**
**इयत्ता ९ वी**

ती पहाट मला अजूनही आठवते. त्याचे झाले असे. आई रोज पाच वाजता उठते व मलाही उठवते. मी माझे सर्व आवरून अभ्यासाला बसतो. नंतर सव्वासहाला विमानतळावर फिरायला जातो. त्या दिवशी अभ्यासाला आईने नेहमीप्रमाणे उठवले. मी उठण्यास नकार दिला. अजिबात झोप झाली नाही असे सांगितले. तरीही आईने मला बळजबरीने उठवलेच.

मी अभ्यास करत असताना आईने वडिलांना उठवले. ते झोप न झाल्यामुळे चिडले होते. आईला लवकर आवरून वेळापूरला जायचे असल्याने तिने वडिलांनाही उठायला भाग पाडले. आईने धाकटा भाऊ अजयला उठवले. त्याची सव्वासहा वाजता शाळा होती. मात्र त्याला उठवल्यावर तोही पाच मिनिटे झोपू दे असे म्हणून परत झोपला. तरीही त्याला बळेच उठवले.


नंतर मी नेहमीप्रमाणे विमानतळावर फिरावयास गेलो. जाताना रस्त्यावर कोणीच दिसले नाही फक्त घराजवळच्या डॉ. कोरडेंच्या दवाखान्याजवळ एक घूस दिसली. तसाच पुढे गेलो. तेथील दोन चार बंगल्यातील कुत्री मला भुंकली. मी सायकलचे स्पीड वाढवले. मी गिरवी नाक्यावर गेल्यावर एक सफारी गाडी दिसली. मला बघताच गाडीचा वेग वाढला.

मला विमानतळावरही कोणीच दिसले नाही. मला वाटले आज फलटणात कोणी मोठी व्यक्ती गेली आाहे म्हणून सगळे बंद आहे. मी नेहमीप्रमाणे व्यायाम करून माघारी आलो. तरी मला कोणच दिसले नाही. घरी गेल्यावर वडिलांना हे सर्व सांगितले तेव्हा त्यांनी त्यांचे घड्याळ आणायला सांगितले. त्यांनी घड्याळात पाहिले असता त्यात अडीच वाजले होते. आईचे घड्याळ घेऊन पाहिले, हॉलमधील घड्याळ पाहिले तरी त्यातही अडीचच वाजले होते. असे कसे झाले म्हणून आम्ही सर्व घड्याळे बघितली. तेव्हा आईच्या मोबाइलमध्ये व गजरच्या घड्याळामध्ये सात वाजलेले दिसले. आदल्या दिवशी संध्याकाळी मी आईच्या मोबाईलमधील रेखांश स्थान बदलले होते. त्यामुळे घड्याळ साडेचार तास पुढे गेले होते. त्यामुळे साडेबारालाच मोबाइलमध्ये सकाळच्या पाचचा गजर झाला. खरेतर त्यावेळी आईलाही उठवत नव्हते. तरी सर्वांचे

लवकर आवरल्याशिवाय पर्याय नाही म्हणून आई उठली. गजरच्या घड्याळात पाहिले तर त्यात साडेबारा वाजले होते. आईने त्यात बिघाड झाला असेल असे समजून घड्याळात पाच वाजवून घड्याळ बाजूला ठेवले व त्यानुसार पुढे कामे आवरण्यास सुरूवात केली.

म्हणजेच आई साडेबाराला उठली होती, मी रात्री पावणे दोन वाजता फिरायला गेलो होतो व अडीच वाजता घरी परत आलो होतो. आईचा सर्व स्वयंपाकही झाला होता. मी परत आल्यावर सर्व घड्याळे पाहिल्यावर खरा प्रकार लक्षात आला. तोपर्यंत पावणेतीन वाजले होते. आम्ही पुन्हा सहाचा गजर लावून झोपलो. केवळ मोबाईलवर विश्वास ठेवल्याने हा सगळा प्रकार घडला होता.


❑




---

## ती वाळलेली तुळस

ती वाळलेली तुळस
म्हातारपणाचा तिने गाठला कळस
फुलायचा तिला आला असेल आळस
तिच्यापेक्षा छान दिसतो
हा ओबड धोबड पळस
तिच्याकडे बघून मला वाटते किळस
का मीच पाणी घातलं नाही
म्हणून वाळली ही तुळस?
नंतर मी तिला घातलं पाणी,
न करता आळस
मग तिला आलं बाळसं


वैष्णवी हेंद्रे

**वैष्णवी हेंद्रे**
इ. ७ वी

# मामाजी के गाँव में

मामाजी के गाँव में
छोटी-सी बिल्ली रे ।

ऊपर से नीचे आती है ।
नीचे से ऊपर जाती है ।
उसकी लंबी सी पुछिया रे ।
मामाजी के गाँव में
छोटी-सी बिल्ली रे ।

कागज को चूहा समझती है ।
उसके साथ भागती है ।
उसकी लंबी सी पुछिया रे ।
मामाजी के गाँव में
छोटी-सी बिल्ली रे ।

दूध के लिए लपकती है ।
न दो तो गुर्राती है ।
उसकी लंबी सी पुछिया रे ।
मामाजी के गाँव में
छोटी-सी बिल्ली रे ।

एक दिन गई वह बाहर
बडी देर से न आई घर
नींद से मैं जागा
उसे ढूँढने भागा
उसकी लंबी सी पुछिया रे ।
मामाजी के गाँव में
छोटी-सी बिल्ली रे ।

**आशुतोष शिंदे**
इ. ६ वी



# खेत की सैर

**प्रणित घोरपडे, शिवम खांडेकर**
**इयत्ता ६ वी**

वह दिन रविवार का था। दोस्तों ने कहा प्रणित, कल हम तेरे सासकल के खेत चलेंगे। मैने कहा ठीक है। शिवम ने प्लानिंग किया। हम नौ बजे फलटण से साईकल पर सासकल के लिए निकल पडे। रास्ते में कुछ लोग ट्रक में कुछ सामान ले जा रहे थे। हमे लगा की वह लकडी चोरी करके ले जा रहे हैं। हमने उनसे पूछा तो उन्होंने कहा कि हमारे खेत की लकडी है। हम वहाँ से जल्दी निकल पडे। हमें बहुत पसीना आया था और प्यास भी लगी थी। फिर हमने बोअर का पानी पिया। वह बहुत मीठा था। हम बातें करते करते जा रहे थे। इतने में सासकल आ गया। हम वहाँ साडे दस बजे पहुँचे।

वहाँ हमने थोडा आराम किया। फिर हम दुर्गा माता मंदिर पहुँचे और दर्शन करके वापस लौटे। वहाँ से मेरे दोस्तों के साथ मेरी दादी और मेरा भाई खेत में जाने के लिए निकले। जाते जाते हमने हरे के चने लिए। फिर हम एक विशाल इमली के पेड के पास पहुँचे। उस पेड पर बडी-बडी इमलियाँ थी वह हमने निकाली। फिर हमारा सैर सपाटा शुरू हुआ। हम मेरे खेत में पहुँचे। वहाँ हमें गिलहरी और खरगोश के बच्चे दिखाई दिए। फिर हमने हमारा कुआँ देखा। वहाँ हमने तैरने का मजा लूटा। हमें वहाँ मोर के बहुत पर दिखाई दिए। हमे बहुत प्यास लगी थी। फिर हमने इख का रस पिया। फिर हम गाँव के नाले के पास पहुँचे। वहाँ भी हमने मजा लूटा। जब वापस मेरे घर पहुँचे तो वहाँ हमने भोजन किया।

हम रात को साडे सात बजे वहाँ से निकले। रास्ते में बहुत अंधेरा था। अचानक हमारे सामने से एक बिल्ली गई। हमे लगा की वह शेर है। हम बहुत घबरा रहे थे। फिर हमें इमली के पेड पर एक स्त्री दिखाई दी। हमने चिल्लीचोट किया। हमें उस पेड पर एक कपडा भी लटकता हुआ दिखाई दिया। हम बहुत घबरा गए और तेजी से निकल पडे। ऐसा करते करते फलटण आ गया। हम ठीक-ठाक घर पहुँचे। वह रविवार का दिन हम कभी नही भूलेंगे।

❑

## मेरा भैय्या

नटखट नटखट प्यारा प्यारा
मेरा भैय्या सबसे न्यारा
आदित्य उसका सुंदर नाम
मस्ती करना उसका काम
सभी कामों में मुझे सताता
हमेशा बहुत तंग करता
लाल लाल है उसे पसंद रंग
छोटे काम करने का निराला ही ढंग
सच्चे दोस्त उसके अवधूत और अभी
पर उसके साथ खेलते हैं बच्चे सभी
कभी कभी वो मुझे रूलाता
और मेरे साथ मस्ती करता
शौक उसका गाना गाना
और बहुत लड्डू खाना
कभी-कभी वो सुनाता है कहानी
मेरे सामने चलती है उसकी मनमानी
ऐसा मेरा भैय्या न्यारा
मुझे लगता बहुत प्यारा

**समीक्षा दीक्षित**

इ. ६ वी



## काँव-काँव

जा रहा था सामने से हाथी।
मैंने पूछा, बनोगे मेरे साथी?
उसने मुझे उठाकर
पेड की डंगाल पर बिठाया।
मुझे तो बडा मजा आया।
उसे भी मेरा साथ भाया।
कौए की काँव-काँवने मुझे जगाया।

**मयूर गायकवाड**

इ. ६ वी

## क्या हुआ गौरी

बात है बहुत पुरानी, मुझे देखकर
सबको याद आती अपनी-अपनी नानी

मैं थी एक पुलिस अफसर
चोरों को पकडती अपने दमपर

एक दिन जा रही थी रास्ते से
एक चोर चुरा रहा था माल घर से

मुझे बडा गुस्सा आया
उसे एक तमाचा लगाया

उसे याद आई नानी
वैसे बात है बडी पुरानी

मैंने उसे पकडा और पूछा
बोल करेगा कभी चोरी?

तभी माँ ने जगाया
कहा क्या हुआ गौरी?

**गौरी स्वामी**
इ. ६ वी




## धूमधाम

परसो था शनिवार
आधी छुट्टी का दिन ये मजेदार
कल था रविवार
सारा दिन था हमारे ही नाम
आज है सोमवार
सारा वक्त दिया पढाई में ध्यान
क्योंकि कल है मंगलवार
उस दिन से शुरू है
भाई हमारी एक्झाम
उसके खतम होने पर
मचाएँगे हम धूमधाम

**कल्याणी सस्ते**
इ. ६ वी

# In the Flood

Akshata Magar

Standard 8

On that evening when it was time to go home from the school it started drizzling. So I started for home in a hurry because there is a stream near my house. I was afraid that the water would have come on the bridge.

When I came to the stream I saw that my fear had turned to be true. The flood water had come on the bridge. I was very frightened. How would I reach home? Just then my aunt and uncle came there. Now I wasn't afraid.

An hour passed. The flood water died down. One man entered the water on the bridge and reached safety on the other side. So other people too started walking on the bridge. I also started walking with my aunt. I was very frightened because the water was pulling me backwards. I closed my eyes and held my aunt's hand very tightly. We moved very slowly. Sometimes I thought that I would flow away with the water but my aunt kept comforting me. When we came to the centre of the bridge I slipped but my aunt held me. I was very frightened.

At least we came out of the flood. I was very tired. After that I went home. But I can never forget this incident in my life.

❑



ऐश्वर्या भोकरे

# A Stormy Rainy Day

Pranjali Bhujbal
Standard 8

Everyone has some memories about rain. I too have some. Some of them are good and some are bad.

That day black clouds had gathered in the sky. That was the last day of the month so the school finished early. It was drizzling. In between, the thunder could be heard. Electricity had gone off. It was afternoon but everything looked dark. The school bell rang and all students started hurrying home. On that day Sayali, Akshata and I had not brought our bicycles. So we started running home. At the square it started raining heavily. So we started running faster and faster.

At a turn Akshata started crying to stop somewhere, so we stopped under a tree. We saw that the frogs were happy and they were swimming in the puddles. There were mushrooms around. Suddenly a small branch fell nearby. We were afraid. Sayali and I started running again. But Akshata didn't wish to run. After a few seconds she started shouting, "Wait for me! Wait for me!" and joined us. We did not care about our uniforms. We were completely wet.

At last we reached Sayali's house. We were shivering with cold. Sayali's mother gave us towels and dry clothes to change. She also made hot



creamy coffee. We drank it and felt much warmer.

The rain had nearly stopped. And the sun had come out again. The trees looked as if they had taken a bath. The birds were chirping on the branches.

I called home. My mother was worried about me. She came to take me home. On the way I told my mother about this stormy rainy day.

❑

# SOLVE MY RIDDLES

Standard 5

i.

I am not a living thing
I am not a bird but I have long wings
I can fly up in the sky,
who am I?

**Rohan Taware**

ii.

Door has a nose
Nose has a ring
Opens with a key
What is this thing?

**Saloni Wala**

iii.

I stand on one leg.
I have hundred hands and thousand fingers.
When it rains my fingers sleep.
Who am I?

**Sitara Maner**

iv.

Starts wit 'e'
Ends with 'h'
A planet with water
Tell me its name.

**Rushikesh Nimbalkar**

# My School

Ruturaj Kadam

Standard 8

I think I am very lucky because I am in Kamala Nimbkar Balbhavan. This is the name of my school. My school is always trying to do something innovative and different from other schools. So I always feel proud of my school.


In my school there are many activities. Balsansad is a wonderful and useful activity. I have also been a minister of Balsansad. This activity shows students how the parliament works.


Every year we make annual project. It is very important part of our school. We like to work on the annual project. We make poems, puzzles and draw pictures. We visit villages, interview people and write information. We also make models. In our school every student has the freedom to learn things by himself. We are allowed to read books in the library and also to do experiments in the science laboratory.

*Navneet* is the annual publication of our school. I like to write for *Navneet*. Teachers of my school are very nice. They teach us very carefully and put their hearts in it. They treat us like friends. They never beat any one of us. They always support us and try to teach us to become better human beings.

Because of all these things I love my school. My school is my second home. When I have to leave my school I will really miss it. There is a huge place in my heart for my school.

❑





भौमितिक आकारांपासून डिझाइन तयार करताना इ. ६ वीची मुले.



"अरे वा! त्रिकोणांचा आयत झाला की."

